# प्रसिद्धी विभाग

## राष्ट्रीय सेवा योजना – आपत्ती व्यवस्थापन शिबीर

पुणे जिल्हा ३ पुढारी | पुणे, गुरुवार २३ ऑगस्ट २०१२



राजगुरुनगर येथे झालेल्या आपत्ती व्यवस्थापन शिबिरात आग प्रात्यक्षिकात सहभागी झालेली विद्यार्थिनी.

### विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.शनिवारी (दि.१८) व रविवारी (दि.१९) असे दोन दिवस हुतात्मा राजगुरू क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या या शिबिरात ६० विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. पुणे येथील डिझायनर मॅनेजमेंट अँड रीसर्च फाउंडेशन संस्था आणि महाविद्यालयातील एनएसएस पथकाच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. आग, पूर,भूकंप,रस्त्यावरील अपघात अशा विविध आपत्ती प्रसंगी घ्यावयाची काळजी आणि आपत्तीग्रस्तांना मदत देण्याचे प्रशिक्षण यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आले. डिझायनर मॅनेजमेंट संस्थेचे उपाध्यक्ष, निवृत्त कर्नल प्रमोद मराठे, संस्थेचे विश्वस्त नीलेश संभुस,रूपेश निंबाळकर यांनी काही प्रात्यक्षिकांसह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिरीष पिंगळे, प्रा.दिलीप मुळुक व प्रा.डॉ.संजय शिंदे यांनी आयोजनात सहभाग घेतला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख